ग्रँट मंजूर केल्याचे शासकीय पत्र.

Shri Shivaji College of
Education, Amravati.
Faculty of Phy. Education
No. :- 13/Phy/Edn/84
Date :- 8/10/84

बीपीएड[एक वर्ष] बीपीएड[३ वर्षे] चा अभ्यासक्रम चालविणा-या शिवाजी शारीरिक शिक्षण महाविद्यालय, अमरावती यांना अनुदान देणेबाबत

---

महाराष्ट्र शासन.
समाजकल्याण, सांस्कृतिक कार्य, क्रीडा व पर्यटन विभाग,
शासन निर्णय, क्र. पीएचई १३८४/१२७६५/एसवायएस
मंत्रालय विस्तार भवन, मुंबई-४०० ०३२
दिनांक:- २५ सप्टेंबर, १९८४.

पहा:- १]शासन निर्णय, समाजकल्याण, सांस्कृतिक कार्य, क्रीडा व पर्यटन विभाग, क्र. पीएचई १३७८/१७९९४/का-११, दिनांक ६ एप्रिल, १९८३.
२]संचालक, क्रीडा व युवकसेवा, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे क्र. अशाशि/१०८३/१६२९/का. ७, दिनांक १४ मे, १९८४.

शासन निर्णय:- महाराष्ट्र राज्यांतील बीपीएड [१ वर्षाचा ] व बीपीएड [३वर्षाचा] अभ्यासक्रम चालविणा-या अशासकीय शारीरिक शिक्षण महाविद्यालयांना अनुदान देण्याचे प्रमाणास शासन निर्णय, समाजकल्याण, सांस्कृतिक कार्य, क्रीडा व पर्यटन विभाग, क्र. पीएचई १३७८/१७९९४/का-११, दिनांक ६ एप्रिल, १९८३ अन्वये मंजूरी दिलेली आहे. सदरहू आदेश १ एप्रिल, १९८३ पासून [म्हणजेच १९८३-८४ हया वित्तिय वर्षीपासून] अंमलांत आले आहेत. "अशासकीय शारीरिक शिक्षण महाविद्यालयांना अनुदान देण्याचे प्रमाण" शिवाजी शारीरिक शिक्षण महाविद्यालय, अमरावती यांनाही लागू करण्याचा प्रस्ताव काही काल शासनाच्या विचाराधीन होता. शिवाजी शारीरिक शिक्षण महाविद्यालय, अमरावती हे १९८४-८५ पासून नियमानुसार, शारीरिक शिक्षणाचे अभ्यासक्रम चालवित असल्याकारणाने "अशासकीय शारीरिक शिक्षण महाविद्यालयाना देण्यात येणा-या अनुदानाच्या प्रमाणात" या महाविद्यालयास १९८४-८५ या वित्तिय वर्षापासून अनुदान द्यावयास शासनाची मंजूरी आहे. संचालक, क्रीडा व युवकसेवा, महाराष्ट्र राज्य, पुणे यांनी याबाबत त्वरित कार्यवाही करावी ही विनंती.

२. याबाबत होणारा खर्च हा "२७७-शिक्षण-जी क्रीडा व युवक कल्याण[एयू] शारीरिक शिक्षण(चार) [ए] अशासकीय शारीरिक शिक्षण महाविद्यालयांना आर्थिक सहाय्य ( २७७-१८१-२) [योजनेतर] मागणी क्र. १५७"या आर्थिक शीर्षाखाली चालू वर्षीच्या १९८४-८५ च्या आर्थिक तरतुदीतून भागविण्यांत येईल.

३. सदरहू निर्णय हा वित्त विभागाच्या सहमतीने त्या विभागाच्या अनौपचारिक संदर्भ क्र. सीआर १४००/८४/इएक्सपी११, दिनांक १७-८-१९८४ अन्वये निर्गमित करण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

[ मु. र. रेगे ]
कार्यासन अधिकारी

....२

प्रति,

संचालक, क्रीडा व युवक सेवा, महाराष्ट्र राज्य, पुणे.
संचालक, शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे.
उप संचालक, क्रीडा व युवक सेवा महाराष्ट्र राज्य पुणे / नागपूर / औरंगाबाद / मुंबई.

सर्व जिल्हा क्रीडा अधिकारी.
कुलगुरु, अमरावती विद्यापीठ, जि. अमरावती.
प्राचार्य, अशासकीय शारिरीक शिक्षण महाविद्यालये.
महालेखापाल, महाराष्ट्र- १, मुंबई.
महालेखापाल, महाराष्ट्र- २, नागपूर.
अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई.
निवासी लेखा अधिकारी, मुंबई.
जिल्हा कोषागार अधिकारी, पुणे.
वित्त विभाग ( व्यय-११ ) मंत्रालय, मुंबई.
शिक्षण व सेवायोजन विभाग, मंत्रालय, मुंबई.
निवड नस्ती- एसवायएस.

~~सहपत्रक~~ - (१)

नागपूर विद्यापीठ, नागपूर यांस अमरावती
येथील श्री शिवाजी शिक्षण महाविद्यालयाचे
जून, १९७५-७६ चे सत्रापासूनचे संलग्नीकरण

महाराष्ट्र शासन
शिक्षण व युवकसेवा विभाग,
शासन निर्णय क्रमांक युएनव्ही १७७५/७९ २०२ (ऊयु) पंधरवीस
सचिवालय विस्तार भवन, मुंबई ३२.
दिनांक २९ जुलै, १९७६

31-7-76

संदर्भ: - १) कुलसचिव नागपूर विद्यापीठ, नागपूर यांचे
क्र. वि. म. वि. क्र. २७२९
दिनांक २ जुलै, १९७५ चे पत्र

शासन निर्णय: - नागपूर विद्यापीठ अधिनियम १९७४ च्या ४२ व्या कलमाच्या (५) व (७) उप-कलमान्वये असलेल्या अधिकारानुसार नागपूर विद्यापीठाशी अमरावती येथील श्री शिवाजी शिक्षण महाविद्यालयाचे खालील अभ्यासक्रम शिकविण्यासाठी १९७५-७६ पासून दोन वर्षांकरिता संलग्नीकरणाच्या विस्ताराला खालील अटींवर शासन मान्यता देत आहे :—

| | अभ्यासक्रम विषय | अटी |
|---|---|---|
| १) | बी.पी. एड्. सर्व आवश्यक विषय | १) शासनातर्फे पाठ्यक्रमासाठी अनुदान मिळणार नाही. |
| २) | डी.पी. एड्. " | २) सन १९७४-७५ या वर्षानंतर या महाविद्यालयातून जे विद्यार्थी डी. पी. एड्. अभ्यासक्रम उत्तीर्ण होतील, त्यांना (Course) संबंधित अभ्यासक्रमाकरिता (reorientation) पात्र समजण्यात येणार नाही. |
| | | ३) शासनमान्य शैक्षणिक संस्थांमधून शारीरिक शिक्षण शिक्षकांच्या जागांसाठी डी. पी. एड्. अभ्यासक्रम पूर्ण करणारे उमेदवार अर्हताप्राप्त समजण्यात येणार नाहीत. |

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Please put before the Principal
W.S. Rode
31-7-76

व. अ. पाटील

( व. अ. पाटील )
कार्यासन अधिकारी,

1975-76
1976-77

प्रत: - शिक्षण संचालक, महाराष्ट्र राज्य, पुणे
कुलसचिव, नागपूर विद्यापीठ, नागपूर,
प्राचार्य, श्री शिवाजी शिक्षण महाविद्यालय, अमरावती
निवड नस्ती डेस्क-नंबर पंधरवीस
समाजकल्याण सांस्कृतिक कार्य व क्रीडा व पर्यटन विभाग, सचिवालय, मुंबई ३२.
डायरेक्टर ऑफ स्पोर्टस् (पुणे)
शिक्षण उपसंचालक, लेखा परीक्षा पथक, मुंबई.
मुख्य लेखा परीक्षक, स्थानिक लेखा परीक्षण कार्यालय, मुंबई.
डेस्क २१.७.

Seen
[signature]
7/9/76

1975-76
76-77

ATTESTED

[signature]
PRINCIPAL,
Shri Shivaji College of Education,
(Faculty of Physical Education)
Amravati.

ATTESTED

[signature]
Principal
Shri Shivaji College of Education,
(Faculty of Physical Education)
Amravati.

Scanned with CamScanner